# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ९८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२९ नोव्हेंबर, २०१६ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ९८ वी बैठक मंगळवार, दि.२९ नोव्हेंबर, २०१६ रोजी दुपारी ०१:०० वाजता** नियोजित प्रमाणे व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. मालदार एन. एन. - मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई यांच्या वतीने व मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी डॉ. देशपांडे एस. एम., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर | सदस्य |
| ३) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | डॉ. शेवाळे बी. सी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| ५) | श्री. पाटील बी. पी., परीक्षा नियंत्रक तथा I/C कुलसचिव | कायम निमंत्रित तथा सचिव |

**स्वागत:**

मा. I/C कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २७ (१) (एच) नुसार, अधिसभेने दि.१९/११/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्र.४ अन्वये, विद्यापीठाच्या अधिविभागातील विभागप्रमुखांमधून व्यवस्थापन परिषदेवर डॉ. ए. ए. घनवट यांचे नामनिर्देशन केले आहे. डॉ. ए. ए. घनवट यांची व्यवस्थापन परिषदेची दि.२९/११/२०१६ ची पहिलीच बैठक असल्याने व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. अध्यक्ष महोदयांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. नंदनवार डी. आर., प्रभारी सहसंचालक, (तंत्र शिक्षण) पुणे मा. संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] २५ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

ठराव : २५ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

[ ०२ ] **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

ठराव : **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या दि.१६/१०/२०१६ पासून दि.१६/११/२०१६ पर्यंतच्या आढावा अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] विद्यापीठ वाहन क्रमांक एम. एच. १३ ए. सी. ९९८८ हुंडाई वेरणा (डिझेल) व एम. एच. १३ बी. ५९६६ (टाटा सुमो स्पेसिओ गोल्ड) या वाहनांची विक्री करण्यासाठी दि.२१/१०/२०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या लिलावासंदर्भातील कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव व सदर लिलावानंतर वाहन खरेदी करणेसंदर्भात प्राप्त झालेले विनंती अर्ज व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: एम.एच.१३ ए.सी.९९८८ हुंडाई वेरणा व एम.एच.१३ बी.५९६६ टाटा सुमो स्पेसिओ गोल्ड या दोन वाहनांचा लिलाव दि.२१ ऑक्टोबर, २०१६ रोजी दुपारी ०३:०० वाजता विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यास मा.कुलगुरुसाो यांनी दि.३ ऑक्टोबर, २०१६ रोजी मान्यता दिलेली होती.

| | | |
|---|---|---|
| Government Registered Valuator यांनी काढलेली किंमत | एम.एच.१३ ए.सी. ९९८८ | ₹३,००,०००/- |
| | एम.एच.१३ बी.५९६६ | ₹,५०,०००/- |

मा.कुलगुरुसाो यांच्या आदेशानुसार, दि.२१ ऑक्टोबर, २०१६ रोजी दुपारी ०३:०० वाजता लिलाव घेण्यात येऊन सोबत जोडल्याप्रमाणे व खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेची शिफारस उपरोक्त समितीने केलेली आहे.

**मुद्दा क्र.१)** विद्यापीठ वाहन क्र. एम.एच.१३ ए.सी.९९८८ हुंडाई वेरणा या वाहनाची विक्री करणेसाठी Government Registered Valuator यांनी ₹३,००,०००/- इतकी किंमत निश्चित केलेली होती व त्याअनुषंगाने विद्यापीठाने ₹२,००,०००/- पासून पुढे ते जास्तीत जास्त किंमत प्राप्त होईल, त्या किंमतीपर्यंत लिलाव करुन सदर वाहन विक्री करण्यास मा.कुलगुरुसाो यांनी दि.३ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता, सदर वाहनाची विक्री करणेसाठी दि.२१/१०/२०१६ रोजी दु.०३:०० वा. मा.कुलसचिव, मा.संचालक म. व वि. वि. मंडळ, मा. परीक्षा नियंत्रक व मा.वित्त व लेखा अधिकारी यांच्या समक्ष लिलाव घेण्यात आला. सदर लिलावात वरील तीन बोलीधारकांनी सहभाग घेतला होता, या लिलावात श्री. शहीद गुलाब वळसंगकर यांनी सर्वात जास्त ₹१,७०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख सत्तर हजार फक्त्) इतकी बोली बोलली होती.

परंतु सदर वाहनाची विद्यापीठाने लिलावासाठी निश्चित केलेल्या ₹२,००,०००/- रकमेच्या पुढे कोणीही बोली न बोलल्याने समितीने सदर वाहन विक्री न करण्याची शिफारस केलेली असून सदरची बाब माहितीस्तव सादर.

**मुद्दा क्र.२)** विद्यापीठ वाहन क्र. एम.एच.१३ बी.५९६६ टाटा सुमो या वाहनाची विक्री करणेसाठी Government Registered Valuator यांनी श्री. शहीद गुलाब वळसंगकर यांनी सर्वात जास्त ₹१,७०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख सत्तर हजार फक्त) इतकी बोली बोलली होती. ₹१,५०,०००/- इतकी निश्चित केलेली होती व त्याअनुषंगाने विद्यापीठाने ₹१,००,०००/- पासून पुढे ते जास्तीत जास्त किंमत प्राप्त होईल, त्या किंमतीपर्यंत लिलाव करुन सदर वाहन विक्री करण्यास मा.कुलगुरुसाो यांनी दि.३ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता, सदर वाहनाची विक्री करणेसाठी दि.२१/१०/२०१६ रोजी दु.०३:०० वा. मा.कुलसचिव, मा.संचालक म. वि. वि. मंडळ, मा.परीक्षा नियंत्रक व मा. वित्त व लेखा अधिकारी यांच्या समक्ष लिलाव घेण्यात आला. सदर लिलावात वरील चार बोलीधारकांनी सहभा घेतला होता. या लिलावात श्री.कासीम अल्लाऊद्दीन शेख यांनी ₹७५,०००/- (अक्षरी पंचाहत्तर हजा रुपये फक्त) व श्री.अस्लम जैनुद्दीन सय्यद यांनी ₹८५,०००/- (अक्षरी पंच्याऐंशी हजार रुपये फक्त) सर्वात जास्त बोली बोलली होती, परंतु सदर वाहनाची विद्यापीठाने लिलावासाठी निश्चित केलेल्या ₹१,००,०००/- रकमेच्या पुढे कोणीही बोली न बोलल्याने समितीने सदर वाहन विक्री न करण्याची शिफारस केलेली असून सदरची बाब माहितीस्तव सादर.

**मुद्दा क्र.३)** वित्त व लेखा विभागाकडून काढून घेण्यात आलेप्रमाणे Depreciation वजा जाता दि.३१ मार्च, २०१७ पर्यंत एम.एच.१३ ए.सी.९९८८ या वाहनाची ₹३,६१,६९०/-व एम.एच.१३ बी.५९६६ या वाहनाची ₹१,०४,२५३/- किंमत आहे. सदरची बाब माहितीस्तव सादर.

**मुद्दा क्र.४)अ)** दि.२१/१०/२०१६ रोजीच्या लिलावात सहभागी न झालेले श्री. रमेश शिवाजी गायकवाड यांनी एम.एच.१३ ए.सी.९९८८ हे वाहन खरेदी करण्याच्या दृष्टीने सदर वाहन ₹२,००,०००/- या किंमतीला मिळावे अशी दि.२५/१०/२०१६ रोजीच्या अर्जान्वये विनंती केलेली आहे.

**ब)** दि.२१/१०/२०१६ रोजी लिलाव झालेनंतर मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केलेप्रमाणे एम.एच.१३ ए.सी.९९८८ हे वाहन खरेदी करण्याच्या दृष्टीने सर्वात जास्त बोली बोललेले श्री. अ. शहीद गुलाब वळसंगकर यांनी सदर वाहन ₹२,०१,०००/- या किंमतीस मिळावे अशी दि.२६/१०/२०१६ रोजीच्या अर्जान्वये विनंती केलेली आहे.

**क)** दि.२१/१०/२०१६ रोजीच्या लिलावात सहभागी न झालेले श्री. चंद्रकांत शिवाजी गायकवाड यांनी एम.एच.१३ ए.सी.९९८८ हे वाहन खरेदी करण्याच्या दृष्टीने सदर वाहन ₹२,०५,०००/- या किंमतीस मिळावे अशी दि.२८/१०/२०१६ रोजीच्या अर्जान्वये विनंती केलेली आहे.

मुद्दा क्र. १ व २ व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर तसेच मुद्दा क्र.३ मधील वस्तुस्थिती विचारात घेता मुद्दा क्र.४ मधील प्राप्त अर्ज व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **विद्यापीठ वाहन क्रमांक एम. एच. १३ ए. सी. ९९८८ हुंडाई वेरणा (डिझेल) व एम. एच. १३ बी. ५९६६ (टाटा सुमो स्पेसिओ गोल्ड) या वाहनासंदर्भात मुद्दा क्र.१, २, ३ ची नोंद घेण्यात आली तसेच मुद्दा क्र.४ अ, ब, क नुसार, विनंती अमान्य करण्यात येवून या दोन्ही वाहनांचा पुनश्च: लिलाव करण्याचे सर्वानुमते ठरले.**

**[ ०४ ] एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी:- मा.सहसचिव, सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर यांचेकडून संस्थेचे संचलित एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | बंद करावयाचा अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर. ता.सांगोला, जि.सोलापूर. | एन.बी.नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगांव, सोलापूर. | शै.वर्ष २०१७-१८ पासून | मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) (प्रवेश क्षमता-१२०) | कायम विनाअनुदानित |

एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) या अभ्यासक्रमास ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे पत्र क्र. Western/१-७१०७५७४२०/२०१२/EOA दि. १०/०५/२०१२ अन्वये व उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्र. टीईएम-२०१२/प्र.क्र.९८ (भाग-१) /तांशि-४, दि. ३०/०६/२०१२ अन्वये शै.वर्ष २०१२-१३ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती. उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने व स्थानिक चौकशी समितीच्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) या अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्नीकरणास शै.वर्ष २०१२-१३ पासून कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली होती.

सदर महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) या अभ्यासक्रमास शै.वर्ष २०१६-१७ पर्यंत मान्यता आहे. परंतु सदर अभ्यासक्रमास मागणी कमी असल्यामुळे तसेच या अभ्यासक्रमासाठी नियमित १८० विद्यार्थी क्षमता असलेला ०४ वर्षाचा अभ्यासक्रम उपलब्ध असल्याने महाविद्यालयाने शै.वर्ष २०१७-१८ पासून मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमुद केले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे) मधील तरतूदीची छायांकित प्रत व तद्नुषंगिक परिनियम ३७४ ते ३८० ची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

महाविद्यालय, विषय/विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी बंद करण्याबबात प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालील त्रिसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती

१. प्राचार्य, डॉ.जे.बी.दफेदार (अध्यक्ष)
२. श्री.एस.आर.दुलंगे (सदस्य)
३. श्री.एस.आर.बरबडे (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशक्षमता / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र ए.आय.सी.टी.ई.कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यास्तव एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व्यवस्थापन परिषदेला शिफारस असणे आवश्यक आहे.

विद्यापरिषदेची सभा दि.१९/०८/२०१६ रोजी संपन्न झाली असून नजीकच्या काळात विद्यापरिषदेची सभा लवकर होण्याची शक्यता नसल्याने व एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०५ ] **एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग)या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने १८० वरुन १२० करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: मा.सहसचिव, सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर यांचेकडून संस्थेचे संचलित एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१७-१८ पासून १८० वरुन १२० करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला होता.

| **संस्थेचे नांव** | **महाविद्यालयाचे नांव** | **अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेतील घट (Reduction in intake)** | **प्रवेशक्षमता कमी करावयाचे वर्ष** | **अनुदानाचा प्रकार** |
|---|---|---|---|---|
| सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर, ता.सांगोला, जि.सोलापूर. | एन.बी.नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगांव, सोलापूर. | अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग) प्रवेशक्षमता ६०(१८०-६०=१२०) | शै.वर्ष २०१७-१८ पासून | कायम विनाअनुदानित |

एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग)या पदवी अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त-६० (१२०+६०=१८०) विद्यार्थी प्रवेशक्षमतेस ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे पत्र क्र. Western/१-१४४१०४२२१४/२०१३/EOA दि. १९/०३/२०१३ अन्वये व उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्र. टीईएम-२०१३/प्र.क्र.१७७/तांशि-४, दि.१५/०५/२०१३ अन्वये शै.वर्ष २०१३-१४ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती. उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने व स्थानिक चौकशी समितीच्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग)या पदवी अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त प्रवेशक्षमता ६० (१२०+६०=१८०) विद्यार्थी प्रवेशक्षमतेस शै.वर्ष २०१३-१४ पासून प्रथम संलग्नीकरण दिलेले होते.

सदर महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या अभ्यासक्रमास शै.वर्ष २०१६-१७ पर्यंत मान्यता आहे. परंतु सदर अभ्यासक्रमाच्या या अतिरिक्त तुकडीसाठी प्रवेशित विद्यार्थी नसल्यामुळे संस्थेने शै.वर्ष २०१७-१८ पासून अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) प्रवेशक्षमता-६० (१८०-६०=१२०) ने कमी करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमूद केले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे) मधील तरतूदीची छायांकित प्रत व तद्नुषंगिक परिनियम ३७४ ते ३८० ची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

महाविद्यालय, विषय/विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी बंद करण्याबबात प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालील त्रिसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१. प्राचार्य, डॉ.जे.बी.दफेदार (अध्यक्ष)
२. श्री.एस.आर.बरबडे (सदस्य)
३. श्री.एस.आर.दुलंगे (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने महाविद्यालयातील शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता-६० (१८०-६०=१२०) ने कमी करण्याचा शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशक्षमता / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र ए.आय.सी.टी.ई.कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यास्तव एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील शै.वर्ष २०१७-१८ पासून, अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता-६० (१८०-६०=१२०) ने कमी करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व्यवस्थापन परिषदेला शिफारस असणे आवश्यक आहे.

विद्यापरिषदेची सभा दि.१९/०८/२०१६ रोजी संपन्न झाली असून नजीकच्या काळात विद्यापरिषदेची सभा लवकर होण्याची शक्यता नसल्याने व एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या महाविद्यालयातील शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता-६० (१८०-६० = १२०) ने कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव महाविद्यालयातील शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ६० (१८०-६०=१२०) ने कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव महाविद्यालयातील शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ६० (१८०-६०=१२०) ने कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने १२० वरुन ६० करण्यासंदर्भात <u>ना-हरकत प्रमाणपत्र</u> निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी:- मा.सहसचिव, सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर यांचेकडून संस्थेचे संचलित एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग)या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१७-१८ पासून १२० वरुन ६० करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला होता.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेतील घट (Reduction in intake) | प्रवेशक्षमता कमी करावयाचे वर्ष | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर ता.सांगोला, जि.सोलापूर | एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर, सोलापूर | अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग) प्रवेशक्षमता ६०(१२०-६०=६०) | शै.वर्ष २०१७-१८ पासून | कायम विनाअनुदानित |

एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या पदवी अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त-६० (६०+६०=१२०) विद्यार्थी प्रवेशक्षमतेस ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे पत्र क्र.Western/१-७१३४९३७६२/२०१२/EOA दि.१०/०५/२०१२ अन्वये व उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्र. टीईएम-२०१२/प्र.क्र.९८(भाग-१) /तांशि -४, दि.३०/०६/२०१२ अन्वये शै.वर्ष २०१२-१३ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती. उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने व स्थानिक चौकशी समितीच्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग)या पदवी अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त प्रवेशक्षमता-६० (६०+६०=१२०) विद्यार्थी प्रवेशक्षमतेस शै.वर्ष २०१२-१३ पासून प्रथम संलग्नीकरण दिलेले होते.

सदर महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या अभ्यासक्रमास शै.वर्ष २०१६-१७ पर्यंत मान्यता आहे. परंतु सदर अभ्यासक्रमाच्या या अतिरिक्त तुकडीसाठी प्रवेशित विद्यार्थी नसल्यामुळे संस्थेने शै.वर्ष २०१७-१८ पासून अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) प्रवेशक्षमता-६० (१२०-६०=६०) ने कमी करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमूद केले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे) मधील तरतूदीची छायांकित प्रत व तद्नुषंगिक परिनियम ३७४ ते ३८० ची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

महाविद्यालय, विषय/विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी बंद करण्याबबात प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालील त्रिसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१. प्राचार्य, डॉ.जे.बी.दफेदार (अध्यक्ष)
२. श्री. एम. आर. मडकी (सदस्य)
३. श्री.के. एस. एल. काझी (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने महाविद्यालयातील शै.वर्ष २०१७-१८ पासून अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) प्रवेशक्षमता-६० (१२०-६०=६०) ने कमी करण्याची शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशक्षमता / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र ए.आय.सी.टी.ई.कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व तद्‌नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यास्तव एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील शै.वर्ष २०१७-१८ पासून अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) प्रवेशक्षमता-६० (१२०-६०=६०) ने कमी करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व्यवस्थापन परिषदेला शिफारस असणे आवश्यक आहे.

तथापि, विद्यापरिषदेची सभा दि.१९/०८/२०१६ रोजी संपन्न झाली असून नजीकच्या काळात विद्यापरिषदेची सभा लवकर होण्याची शक्यता नसल्याने व एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) प्रवेशक्षमता-६० (१२०-६०=६०) ने कमी करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने १२० वरुन ६० करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्यापरिषदेच्या वतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने १२० वरुन ६० करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील अभियांत्रिकी मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्यासंदर्भात <u>ना-हरकत प्रमाणपत्र</u> निर्गमित करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी:- मा.सहसचिव, सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर यांचेकडून संस्थेचे संचलित एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर. या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

| **संस्थेचे नांव** | **महाविद्यालयाचे नांव** | **बंद करावयाचे वर्ष** | **बंद करावयाचा अभ्यासक्रम** | **अनुदानाचा प्रकार** |
|---|---|---|---|---|
| सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर. ता.सांगोला, जि.सोलापूर. | एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर. | शै.वर्ष २०१७-१८ पासून | मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) (प्रवेश क्षमता-१२०) | कायम विनाअनुदानित |

एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर. या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) या अभ्यासक्रमास ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे पत्र क्र. Western/१-७१३४९३७६२/२०१२/EOA दि. १०/०५/२०१२ अन्वये व उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्र. टीईएम-२०१२/प्र.क्र.९८ (भाग-१) /तांशि-४, दि.३०/०६/२०१२ अन्वये शै.वर्ष २०१२-१३ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती. उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने व स्थानिक चौकशी समितीच्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर. या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) या अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्नीकरणास शै.वर्ष २०१२-१३ पासून कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली होती.

सदर महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) या अभ्यासक्रमास शै.वर्ष २०१६-१७ पर्यंत मान्यता आहे. परंतु सदर अभ्यासक्रमास मागणी कमी असल्यामुळे तसेच या अभ्यासक्रमासाठी नियमित १८० विद्यार्थी क्षमता असलेला ०४ वर्षाचा अभ्यासक्रम उपलब्ध असल्याने महाविद्यालयाने शै.वर्ष २०१७-१८ पासून मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमुद केले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे) मधील तरतूदीची छायांकित प्रत व तद्नुषंगिक परिनियम ३७४ ते ३८० ची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

महाविद्यालय, विषय/विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी बंद करण्याबबात प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालील त्रिसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१. प्राचार्य, डॉ.जे.बी.दफेदार (अध्यक्ष)
२. श्री.एस.आर.दुलंगे (सदस्य)
३. श्री.एस. बी. नाईक (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे महाविद्यालय/विषय/अभ्यासक्रम/अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशक्षमता/विद्याशाखा/अतिरिक्त तुकडी बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र ए.आय.सी.टी.ई.कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यास्तव एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर. या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व्यवस्थापन परिषदेला शिफारस असणे आवश्यक आहे.

तथापि, विद्यापरिषदेची सभा दि.१९/०८/२०१६ रोजी संपन्न झाली असून नजीकच्या काळात विद्यापरिषदेची सभा लवकर होण्याची शक्यता नसल्याने व एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर. या महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, एस.के.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील अभियांत्रिकी मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर या महाविद्यालयातील अभियांत्रिकी मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दुसरी पाळी) अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ] श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, ता.उत्तर सोलापूर, संचलित लोकमंगल जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, वडाळा, ता.उत्तर सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१७-१८ पासून लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय, वडाळा, ता.उत्तर सोलापूर असा बदल करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: मा.सचिव, श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, ता.उत्तर सोलापूर, यांच्या कडून संस्थेचे संचलित लोकमंगल जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, वडाळा, ता.उत्तर सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१७-१८ पासून खालीलप्रमाणे बदल करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे सद्य:स्थितीतील नाव | महाविद्यालयाच्या नावातील बदल |
|---|---|---|
| श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर | लोकमंगल जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, वडाळा | **लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय, वडाळा** |

मा.सचिव, श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, यांनी प्रस्तुत अर्जासोबत संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या दि.१७/०७/२०१६ रोजीच्या बैठकीतील महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबतच्या ठराव क्र.०२ ची खरी नक्कल जोडली आहे. प्राप्त प्रस्तावात लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय, वडाळा नाव महाविद्यालयास द्यावे असा ठराव मा.ट्रस्टी यांनी सर्वानुमते घेतला व तसा ठराव मंजूर केला असल्याचे नमूद केले असून महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१७-१८ पासून उक्तप्रमाणे बदल करुन मिळण्याविषयी विनंती केलेली आहे.

महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याच्या प्राप्त प्रस्तावास प्रथमत: महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्यास्तव सदर बाब दि.०८/११/२०१६ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, ठराव क्र.२ अन्वये मा.सचिव, श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, यांनी संस्थेचे संचलित लोकमंगल जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, वडाळा, ता.उत्तर सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१७-१८ पासून लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय, वडाळा, ता.उत्तर सोलापूर असा बदल करण्याची शिफारस महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळानी व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

सबब, श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, संचलित लोकमंगल जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, वडाळा, ता. उत्तर सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१७-१८ पासून लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय, वडाळा, ता.उत्तर सोलापूर असा बदल करण्याची बाब विचारार्थ).

ठराव : **श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, संचलित "लोकमंगल जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, वडाळा, ता. उत्तर सोलापूर" या महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१७-१८ पासून "लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय, वडाळा, ता.उत्तर सोलापूर" असा बदल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७५ (२) (a) (v) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून तीन सदस्यांच्या करावयाच्या नामनिर्देशनाबाबत.**

(टिपणी : विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या निवडणूका ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत पुढे ढकलल्याच्या महाराष्ट्र शासनाने दि.०१/१०/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२५ नुसार कृषीतर व तंत्रज्ञानेतर विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या सदस्यांच्या निवडणूका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठी आणि नामनिर्देशनाद्वारे व स्वीकृतीद्वारे उक्त प्राधिकरणे व मंडळे घटित करण्याबाबत सभा व निवडणूका विभागाने दि.१७/१०/२०१६ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये कळविले आहे.

त्यानुसार महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (२) (a) (v) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून तीन सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे आहे.

सबब, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ७५ (२) (a) (v) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून तीन सदस्यांच्या करावयाच्या नामनिर्देशनाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ७५ (२) (a) (v) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

| अ. क्र. | नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीचे नाव | सूचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १) | डॉ. ए. ए. घनवट | प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील | डॉ. बी. सी. शेवाळे |
| २) | मा. संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण सहसंचालनालय, पुणे यांचे प्रतिनिधी डॉ. एस. एम. देशपांडे, विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर | प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील | डॉ. ए. ए. घनवट |
| ३) | व्यवस्थापन परिषदेमधून वित्त व लेखा समितीवर नामनिर्देशन करण्यासाठी अ.क्र.१ व २ सोडून इतर कोणतेही सदस्य उपलब्ध नसल्याने ही जागा रिक्त ठेवण्यात आली. | | |

**इतर कोणतेही नाव सुचविण्यात न आल्याने वरील अ.क्र. १ व २ प्रमाणे सदस्यांचे व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून वित्त व लेखा समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ १० ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७५ (३) (b) (iii) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांच्या करावयाच्या नामनिर्देशनाबाबत.**

(टिपणी : विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या निवडणूका ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत पुढे ढकलल्याच्या महाराष्ट्र शासनाने दि.०१/१०/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२५ नुसार कृषीतर व तंत्रज्ञानेतर विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या सदस्यांच्या निवडणूका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठी आणि नामनिर्देशनाद्वारे व स्वीकृतीद्वारे उक्त प्राधिकरणे व मंडळे घटित करण्याबाबत सभा व निवडणूका विभागाने दि.१७/१०/२०१६ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये कळविले आहे.

त्यानुसार महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (३) (b) (iii) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे आहे.

सबब, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ७५ (३) (b) (iii) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांच्या करावयाच्या नामनिर्देशनाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ७५ (३) (b) (iii) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालील दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

| अ. क्र. | नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीचे नाव | सूचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १) | डॉ. ए. ए. घनवट | प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील | डॉ. बी. सी. शेवाळे |
| २) | प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील | डॉ. बी. सी. शेवाळे | डॉ. ए. ए. घनवट |

**इतर कोणतेही नाव सुचविण्यात न आल्याने वरील अ.क्र. १ व २ प्रमाणे सदस्यांचे व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून खरेदी समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ११ ] औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे शैक्षणिक प्रशासकीय मुल्यमापन (Academic & Administrative Audit) करण्यासाठी तयार करण्यात आलेली तपासणी सूची / गुणदान पध्दत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी:- प्रस्तुत विद्यापीठाद्वारे सर्व अधिविभाग तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांची शैक्षणिक व प्रशासकीय मुल्यमापन (Academic & Administrative Audit) करण्याची कार्यवाही सुरु असून, पहिल्या टप्प्यात सर्व अनुदानित महाविद्यालयाचे व शैक्षणिक व प्रशासकीय मुल्यमापन (Academic & Administrative Audit) झालेले आहे. सदर अनुदानित महाविद्यालयामध्ये बहुतांश कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा समावेश होता. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये शैक्षणिक व प्रशासकीय मुल्यमापन (Academic & Administrative Audit) च्या दुस-या टप्प्यातील कार्यवाही सुरु असून, यामध्ये बहुतांश (A.I.C.T.E.) अंतर्गत येणा-या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचे (Academic & Administrative Audit) करावयाचे आहे. तथापि (A.I.C.T.E.) अंतर्गत येणा-या अभ्यासक्रमाच्या (Engg/Pharmacy/MCA/MBA/Arch.) महाविद्यालयाचे शैक्षणिक प्रशासकीय मुल्यमापन करण्यासाठी आवश्यक तपासणी सूची व गुणदान पध्द्त प्रस्तुत विद्यापीठाकडे उपलब्ध नव्हती. त्यास्तव सदरकामी तपासणी सूची व गुणदान पध्दत तयार करण्याकामी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

१. प्राचार्य, डॉ. एस.ए. हलकुडे (अध्यक्ष)
२. डॉ.एम.एस. कलशेट्टी (सदस्य)
३. डॉ.व्ही.पी. उबाळे (सदस्य)

उपरोक्त समितीच्या दि.०२/०७/२०१६, दि.२७/०९/२०१६ व २१/१०/२०१६ रोजी बैठक संपन्न झाल्या. समितीने सखोल विचार विनिमय करून सोबत जोडल्याप्रमाणे अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय मुल्यमापन (Academic & Administrative Audit) करण्यासाठी तपासणी सूची व गुणदान पध्दत तयार करून त्यानुसार सर्व संलग्नित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय मुल्यमापन (Academic & Administrative Audit) करण्याबाबत विद्यापीठास शिफारस केलेली आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तपासणी सूची व गुणदान पध्दतीस व्यवस्थापन परिषदेने यापूर्वीच मान्यता दिलेली आहे.

सबब औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे शैक्षणिक प्रशासकीय मुल्यमापन (Academic & Administrative Audit) करण्यासाठी समितीने तयार केलेली तपासणी सूची/गुणदान पध्दत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे शैक्षणिक प्रशासकीय मुल्यमापन (Academic & Administrative Audit) करण्यासाठी समितीने तयार केलेल्या तपासणी सूचीस / गुणदान पध्दतीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[१२(१)] शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चा Annual Quality Assurance Report (AQAR) व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव**

(टिपणी- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चा Annual Quality Assurance Report (AQAR) चे कामकाज प्रा. पी. प्रभाकर, संचालक, भूशास्त्र संकुल यांनी पूर्ण करुन दि.१३/११/२०१६ रोजी सदर अहवाल या विभागाकडे सादर केला होता. सदर AQAR Report ची Word फाईलमधील सॉफ्टकॉपी Track ID व विद्यापीठाच्या MHUNGN11268 SOLAPUR UNIVERSITY SOLAPUR.doc या नावासह तयार करुन naac.aqar@gmail.com या ई-मेलवर दि. १५/११/२०१६ रोजी पाठवणे आवश्यक होते.

तथापि, दरम्यान व्यवस्थापन परिषदेचे आयोजन नसल्याने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी सदर AQAR Report स्वीकारुन तो naac.aqar@gmail.com या ई-मेलवर पाठवण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चा Annual Quality Assurance Report (AQAR) व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

ठराव : **मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[१२(२)] दि.२५/११/२०१६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.१८/११/२०१६ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.१८/११/२०१६ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statute No.S.324 नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.२५/११/२०१६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.१८/११/२०१६ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **दि.१८/११/२०१६ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने दि.२५/११/२०१६ च्या बैठकीत केलेली मान्यतेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[१२(३)] डॉ. सौ. माया जगदीश पाटील सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल प्रस्तूत विद्यापीठ यांना दि. २८/११/२०१६ ते दि.०४/०१/२०१७ अशी एकूण ३८ दिवसांची असाधारण बिनपगारी रजा (Extraordinary Leave) मंजूर करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: डॉ. सौ. माया जगदीश पाटील सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल प्रस्तूत विद्यापीठ यांनी दि.२५/११/२०१६ रोजीच्या अर्जानुसार त्यांची मुलगी कु. ऋतुप्रिया जगदीश पाटील हिचा विवाह दि.१५/१२/२०१६ रोजी जम्मू येथे आयोजित केला आहे. तसेच विवाहा प्रित्यार्थ स्वागत समारंभ दि.२५/१२/२०१६ रोजी पुणे येथे आयोजित केला आहे. तरी दि.२८/११/२०१६ ते दि.०४/०१/२०१७ अशी एकूण ३८ दिवसांची बिनपगारी असाधारण रजा (Extraordinary Leave) मंजूर करावी, अशी विनंती केली आहे.

उपरोक्त अर्जाच्या अनुषंगाने डॉ. सौ. माया पाटील यांनी विनंती केल्यानुसार विद्यापीठाचे परिनियम क्र.२७२ (B) (e) अन्वये दि.२८/११/२०१६ ते दि.०४/०१/२०१७ अशी एकूण ३८ दिवसांची बिनपगारी असाधारण रजा (Extraordinary Leave) व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

ठराव: **डॉ. सौ. माया जगदीश पाटील सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल प्रस्तूत विद्यापीठ यांना दि.२८/११/२०१६ ते दि.०४/०१/२०१७ अशी एकूण ३८ दिवसांची असाधारण बिनपगारी रजा (Extraordinary Leave) कार्यभारानुसार रजेहून परत आल्यावर जादाचे तास घेवून अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या अटीस अधिन राहून मंजूर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[१२(४)] **प्रस्तूत विद्यापीठाकडून वितरित करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रावर फक्त मा. कुलगुरु महोदयांची स्वाक्षरी करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तूत विद्यापीठाच्या स्थापनेपासून आत्तापर्यंत झालेल्या ११ दिक्षांत समारंभामध्ये प्रस्तुत विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आलेल्या पदवी प्रमाणपत्रावर मा. कुलगुरु महोदय आणि मा. कुलसचिव यांच्या संयुक्त स्वाक्षरी करण्यात आलेल्या आहेत. पदवी प्रमाणपत्रावर स्वाक्षरीबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे चौकशी केली असता पदवी प्रमाणपत्रावर विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरुमहोदय यांच्या स्वाक्षरीने विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरीत केली जात असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

वरीलप्रमाणे अन्य विद्यापीठाकडून पदवी प्रमाणपत्रावर स्वाक्षरीबाबतची जी प्रक्रिया राबविली जाते, अगदी त्याच धर्तीवर चालू वर्षापासून पदवी प्रमाणपत्रावर मा.कुलगुरु महोदय यांच्या स्वाक्षरीने पदवी प्रमाणपत्रे देण्याबाबत निर्णय घेणे आवश्यक असल्याने सदरचा विषय दि.१९/११/२०१६ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. त्यावेळी खालीलप्रमाणे ठराव पारित झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.१०(२) | **विद्यापीठाकडून वितरित करण्यात येणा-या पदवी प्रमाणपत्रावर फक्त मा.कुलगुरु महोदयांची स्वाक्षरी करण्याची बाब स्विकारण्यात येवून सदरची शिफारस मा. व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.** |

सबब, प्रस्तूत विद्यापीठाकडून प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रावर चालू दिक्षांत समारंभापासून फक्त मा. कुलगुरुमहोदय यांची स्वाक्षरी करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **प्रस्तूत विद्यापीठाकडून वितरित करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रावर फक्त मा. कुलगुरु महोदयांची स्वाक्षरी करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[१२(५)] विद्यापीठ परिसरातील विविध बांधकाम करणे या कामाकरिता दि.२१/११/२०१६ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरात करावयाच्या बांधकामाबाबत बांधकाम समितीची बैठक दि.२१/११/२०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस विषय क्र.१ ते ११ व आयत्या वेळेचे विषय क्र.१२(१) ते १२(४) सादर करण्यात आले असता, बांधकाम समितीच्या बैठकीतील ठराव क्र.१ ते ११ व आयत्या वेळेचे विषय क्र.१२(१) ते १२(४) नुसार व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस्तव शिफारस करण्यात आली आहे.

सबब, विद्यापीठ परिनियम S.339(f) नुसार दि.२१/११/२०१६ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **विद्यापीठ परिसरातील विविध बांधकाम करणे या कामाकरिता दि.२१/११/२०१६ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास विषय क्र.१ ते ११ व आयत्या वेळेचे विषय क्र.१२(१) ते १२(४) नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[१२(६)] **सोलापूर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातून** 1. Master of Business Administration, (M.B.A.) 2. B.Com III Accountancy I & II, 3. B.E. Mechanical **या विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस सन २०१५-१६ पासून प्रत्येक वर्षी** "Late Shriman Bhausaheb Gandhi Gold Medal" **या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता प्रत्येकी ₹१,००,०००/- अशी एकूण ₹३,००,०००/- प्राप्त देणगी स्विकारण्यास म. वि. कायदा १९९४ कलम १४ (७) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: डॉ. रणजित गांधी, अध्यक्ष, श्री.भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान, सोलापूर यांनी सोलापूर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातून 1.Master of Business Administration, (M.B.A.) 2. B.Com III Accountancy I & II, 3. B.E. Mechanical या विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस सन २०१५-१६ पासून प्रत्येक वर्षी "Late Shriman Bhausaheb Gandhi Gold Medal" या नावाने सुवर्णपदक देण्यासाठी दि.१५/११/२०१६ रोजीच्या पत्रासोबत प्रत्येक विषयाकरिता ₹१,०९,०००/- (अक्षरी एक लाख नऊ हजार फक्त) याप्रमाणे देणगी विद्यापीठास धनादेशाद्वारे दिली आहे. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी उपरोक्त नमूद नावाने सुवर्णपदक देण्यासाठीचा मानस विद्यापीठास कळविला होता.

दरम्यानच्या कालावधीमध्ये व्यवस्थापन परिषद बैठकीची तारीख निश्चित नसल्याने डॉ. रणजित गांधी, अध्यक्ष, श्री. भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान, सोलापूर यांच्याकडून सुवर्णपदकासाठी तीन विषयासाठी प्रत्येकी ₹१,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये फक्त) अशी एकूण ₹३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रुपये फक्त) इतकी रक्कम देणगी म्हणून धनादेशाद्वारे स्विकारण्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेले एकूण तीन धनादेश वित्त व लेखा विभागास जमा करण्यात आले असून ₹१,०९,०००/- इतक्या रक्कमेची पावती क्र.१४५९५, १४५९६ व १४५९७,दि.२४/११/२०१६ अन्वये वित्त व लेखा विभागाने अभ्यासमंडळे विभागाकडे जमा केलेली आहे.

सबब, मा. कुलगुरु महोदयांनी वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

ठराव: **मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

## [१२(७)] तक्रार निवारण समितीच्या पदावर व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या निवडणूका ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत पुढे ढकलल्याच्या महाराष्ट्र शासनाने दि.०१/१०/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे "२०१६ महाराष्ट्र अधिनियम क्र.२५ -कृषितर व तंत्रज्ञानत्तर विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या सदस्यांच्या निवडणूका तात्पूरत्या पुढे ढकलण्यासाठी आणि नामनिर्देशनाद्वारे व स्वीकृतीद्वारे उक्त प्राधिकरणे व मंडळे घटित करण्याबाबत" कळविले आहे.

यापूर्वी म. वि. कायदा १९९४ कलम ५७(३) नूसार गठीत केलेल्या तक्रार निवारण समितीची मुदत दि.३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यास्तव उपरोक्त शासन निर्णयानुसार नव्याने तक्रार निवारण समिती गठित करावी लागणार आहे. त्यास्तव सदर समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करुन घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ५७(३) (a) व ५७(३) (b) नुसार तक्रार निवारण समिती गठित करण्याबाबत खालील प्रमाणे तरतूद नमूद केलेली आहे.

| | |
|---|---|
| महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७(३) (a) | The Pro-Vice Chancellor, where there is no Pro-Vice Chancellor, a member of the Management Council nominated by the Management Council..................... Chairman. |
| महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७(३) (b) | (Two) members of the Managment Council nominated by the Managment Council from amongst themselves (one of them belonging to the Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes (Vimukta Jatis) / Nomadic Tribes or Other Backward Classes, by rotation) ................. Members. |

सबब, तक्रार निवारण समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ५७(३) (a) व ५७(३) (b) च्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्याकरिता हा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.२५ ऑक्टोबर, २०१६ च्या बैठकीत आयत्या वेळेचा विषय क्र.१२(१०) अन्वये सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.१२(१०) | सदर विषयाबाबत पुढील बैठकीत निर्णय घ्यावा असे ठरले. |

वरील ठरावानुसार, तक्रार निवारण समितीच्या पदावर व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाची बाब विचारार्थ).

ठराव : **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७(३) (a) नुसार, तक्रार निवारण समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालील सदस्याचे नामनिर्देशन करण्यात आले.**

| अ. क्र. | नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीचे नाव | सूचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| **१)** | **डॉ. ए. ए. घनवट** | **प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील** | **डॉ. एस. एम. देशपांडे** |
| **२)** | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७ (३) (b) नुसार, चक्रीय पध्दतीने SC प्रवर्गातून नामनिर्देशनासाठी व्यवस्थापन परिषदेमध्ये SC प्रवर्गातील सदस्य नसल्यामूळे ही जागा रिक्त ठेवण्यात आली.** | | |

**इतर कोणतेही नाव सुचविण्यात न आल्याने वरील अ.क्र. १ प्रमाणे सदस्याचे व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून तक्रार निवारण समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.**

**[१२(८)] बांधकाम समितीवरील रिक्त झालेल्या पदावर विद्यापीठ परिनियम S.337 (iv) नुसार नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २४ व ४१ च्या तरतूदीनुसार व परिनियमातील कलम ३३७ अन्वये बांधकाम समिती गठीत करण्याची तरतूद आहे.

विद्यापीठ परिनियम S.337 (iv) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

S.337(iv): Nominee of the Management Council to be nominated by the Management Council.

वरीलप्रमाणे परिनियमातील S.337 (iv) मधील तरतूदीनुसार दि.१९/०५/२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये ठराव क्र.१२ अन्वये बांधकाम समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यामधून श्री. बी. आर. गायकवाड यांचे नामनिर्देशन झालेले होते. परंतु विद्यापीठातील सर्व अधिकारमंडळे हे दि.३१/०८/२०१५ रोजी बरखास्त झालेली असल्यामूळे बांधकाम समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून नामनिर्देशन झालेल्या श्री. बी. आर. गायकवाड यांची मुदत आपोआप संपुष्टात आलेली आहे.

तथापि, महाराष्ट्र शासनाने दि.०१ ऑक्टोबर, २०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठाच्या निवडणूका तात्पुरत्या पुढे ढकलल्यामूळे विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे तात्पुरते गठीत करणेबाबत निर्देशन प्राप्त झालेले आहेत. त्यास अनुसरुन बांधकाम समितीवरील रिक्त झालेल्या पदावर एका सदस्याचे नामनिर्देशन करुन घ्यावे लागणार आहे.

सबब, वरीलप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या दि.०१ ऑक्टोबर, २०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ परिनियम S.337 (iv) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यामधून बांधकाम समितीवर एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याकरिता हा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.२५ ऑक्टोबर, २०१६ च्या बैठकीत आयत्या वेळेचा विषय क्र.१२(११) अन्वये सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.१२(११) | सदर विषयाबाबत पुढील बैठकीत निर्णय घ्यावा असे ठरले. |

वरील ठरावानुसार, बांधकाम समितीवरील रिक्त झालेल्या पदावर विद्यापीठ परिनियम S.337 (iv) नूसार नामनिर्देशनाची बाब विचारार्थ).

ठराव : **विद्यापीठ परिनियम S.337 (iv) नुसार, बांधकाम समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालील सदस्याचे नामनिर्देशन करण्यात आले.**

| अ. क्र. | नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीचे नाव | सूचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १) | मा. संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण सहसंचालनालय, पुणे यांचे प्रतिनिधी डॉ. एस. एम. देशपांडे, विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर | प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील | डॉ. बी. सी. शेवाळे |

**इतर कोणतेही नाव सुचविण्यात न आल्याने वरील अ.क्र. १ प्रमाणे सदस्याचे बांधकाम समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून नामनिर्देशन करण्यात आले.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**